# निशाणी क्र. २०० वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १७ यांचे वारस अभिलेखावर दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. १७ गोविंद उर्फ बाबा नारायण धुवाळी हे दि. २७/०४/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. तरी त्यांना वारस म्हणून सामील करण्यात यावे व तशी दुरुस्ती दाव्यात करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे. सदर प्रतिवादीस खालीलप्रमाणे वारस आहेत.

प्रतिवादी क्र. १७ – गोविंद उर्फ बाबा नारायण धुवाळी – मयत वारस

अ) संजय गोविंद धुवाळी
वय – ४० वर्षे, धंदा – नोकरी,
रा.– नविन चिखलवाडी तिसरा माळा,
साईबाबा मंदिराच्या बाजूची बिल्डींग, पॅडर रोड,
नवी चिखलवाडी, मुंबई नं. ४००००७.

सबब वर नमूद केलेप्रमाणे सदर प्रतिवादी क्र. १७ चे कायदेशीर वारस आहेत. याशिवाय अन्य कोणीही प्रस्तूत प्रतिवादी यास वारस नाहीत. तरी सदर वारसांना दाव्यात सामील करुन मिळणेस व त्याप्रमाणे दाव्याचे कामी तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तूत वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ३ नुसार वादी, प्रतिवादी मयत झालेस त्याच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करून घेणेची तरतूद आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र. १७ हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामी सदरची दुरूस्ती महत्वाची आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. सबब त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी देणे उचित वाटते. त्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तूत प्रतिवादी क्र. १७ चे वारस दाव्यात समाविष्ट केल्यानंतर वादीने दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्ती प्रत दाखल करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: १७/११/२०२१